महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १९ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १७४ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये





## महत्वाचे

## 'आयपीएल'मध्ये झळकणार शहापूरचा भूमिपुत्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** - 'आयपीएल २०२६' च्या मिनी लिलावात उदयोन्मुख (अनकॅप्ड) अर्थात भारतासाठी अद्याप खेळत नसलेल्या खेळाडूंना चांगलाच 'भाव' मिळाल्याचे चित्र आहे. चेन्नई सुपर किंग्स ही उदयोन्मुख खेळाडूंना संघात स्थान देण्यात अग्रेसर ठरली आहे. अशातच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बहुल शहापूर तालुक्यातील भुमिपुत्राने देखील क्रिकेटच्या राष्ट्रीय व्यासपीठावर आपला ठसा उमटवला आहे. हा तरूण थेट आयपीएल २०२६ मध्ये खेळताना दिसणार आहे. शहापुर तालुक्यातील शेरे गावातील हा तरूण आहे. ओंकार तुकाराम तारमळे हे त्याचे पुर्ण नाव. ओंकारची आई ही गृहिणी तर वडील ट्रॅक्टर चालक आहेत. ओंकारने चौथीपर्यंत जिल्हापरिषद शाळेत शिक्षण घेतले. त्यानंतर बारावीपर्यंत वासिंदच्या सरस्वती विद्यालयात त्याचे शिक्षण झाले. त्याला लहानपणापासूनच क्रिकेट व कबड्डीची आवड होती. अगदी सामान्य कुटुंबातील असल्याने त्याने कोणत्याही अकादमी मध्ये न जाता शेरे गावाजवळ असणाऱ्या गेरसे गावातील मोकळ्या मैदानावर क्रिकेटचा खेळण्यास सुरूवात केली.

## महिला संघटना अध्यक्षपद काढले

### माजी नगरसेविका मंदा पाटील यांची मनसेच्या कार्यवाहीवर तीव्र नाराजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - मनसे पक्ष वाढीसाठी, महिला संघटना अध्यक्ष पदाच्या माध्यमातून महिलांचे विविध प्रकारचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. शहरांमधील मनसेचे अस्तित्व शून्य होत असताना पक्ष जीवंत ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्याची किंमत मला कोणतीही पूर्वसूचना न देता माझे मनसेचे डोंबिवली शहर महिला संघटना अध्यक्ष म्हणून काढून घेण्यात आले असेल, तर प्रथम नेत्यांनी मला माझे पद का काढून घेतले याची उत्तरे द्यावीत. त्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही, असे माध्यमांना सांगत मनसेच्या डोंबिवली शहर महिला संघटना अध्यक्षा आणि पाथर्ली प्रभागाच्या माजी नगरसेविका मंदा पाटील यांनी मनसे पक्ष नेत्यांच्या कार्यवाहीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. मनसे पक्ष स्थापनेपासून आपण मनसे पक्षा बरोबर, स्थानिक महिला, शहर पदाधिकाऱ्यांबरोबर समन्वयाने काम करत आहोत. मागील १२ वर्ष आपण मनसेचे महिला संघटना अध्यक्ष म्हणून जबाबदारीने काम करत आहोत. शहरातील महिलांचे अनेक प्रश्न, अन्याय अत्याचाराच्या प्रश्नावर आपण मनसेच्या पदाधिकारी म्हणून पीडित महिलांना आपल्या ताकदीने सर्वोतपरी साहाय्य केले आहे. अचानक आपणास मनसे नेत्यांकडून कोणतीही पूर्वसूचना न देता आपले पद काढून घेण्यात आले, याविषयी आपण तीव्र नाराज आहोत, असे मंदा पाटील यांनी स्पष्ट केले.

## पनवेल मनपा प्रशासन निवडणुकांसाठी सज्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल, ता. १८ (बातमीदार)** महापालिकेच्या निवडणुका निष्पक्ष होण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. याच अनुषंगाने तब्बल साडेचार हजार कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार असून शहरात ३६ भरारी पथके तैनात केली जाणार आहेत. मतदान केंद्रावरील सोयीसुविधा, स्ट्रॉग रूम, मतमोजणी केंद्राबाबतच्या तयारीची माहिती पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी आजच्या (ता. १८) पत्रकार परिषदेत दिली. या वेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे उपस्थित होते. निष्पक्ष निवडणुकांसाठी कर्मचारी नियुक्ती, कक्षाची स्थापना, वेगवेगळया पथकाची स्थापना करणे, अशी कामे अधिक प्राधान्याने केली जात आहेत. यासोबत यंदाच्या निवडणुकीत मतदान कसे वाढवायचे, याचेही प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी जनजागृतीपर उपक्रम घेतले जाणार आहेत. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या अनुषंगाने प्रत्येक तीन प्रभागांसाठी एक निवडणूक निर्णय अधिकारी, दोन सहाय्यक अधिकारी नेमले आहेत.

> **या निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त मतदानाची टक्केवारी गाठण्याचा आमचा प्रयत्न असून, निर्विघ्नपणे मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. - मंगेश चितळे, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, पनवेल**

# भाजप शिवसेनेत १५० जागांवर एकमत!

## 'धनुष्यबाण, कमळ दोन्ही एकच आहेत, कोणत्याही कारणाने युती तुटणार नाही'- अमित साटम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**


**मुंबई : भाजप-शिवसेना जागावाटप चर्चेच्या दुसऱ्या फेरीत १५० जागांवर एकमत झाल्याचे मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम आणि शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांना सांगितले. भाजपने २०१७ च्या महापालिका निवडणुकीत जिंकलेल्या सर्व ८२ जागांवर दावा केला असून शिवसेनेला (एकनाथ शिंदे) मात्र जिंकलेल्या ८४ जागा देण्यास ठाम नकार दिल्याचे उच्चस्तरीय सूत्रांनी 'माध्यमांना' सांगितले.**

भाजपा शिवसेनेच्या नेत्यांमध्ये चर्चेची दुसरी फेरी गुरूवारी पार पडली. भाजपने पहिल्या बैठकीत शिवसेनेला केवळ ५२ जागा देवू केल्या होत्या. तर शिवसेनेने गेल्या निवडणुकीतील ८४ आणि अन्य अशा १२५ जागा मागितल्या होत्या. गेल्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना होती व आताही ठाकरे यांच्या शिवसेनेची ताकद असून शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची तेवढी ताकद नाही, असे कारण देत भाजपने गेल्या निवडणुकीत जिंकलेल्या ८४ जागा देण्यास नकार दिला आहे.



भाजपने मात्र गेल्या निवडणुकीत जिंकलेल्या ८२ जागांवर दावा करीत गेल्या आठ वर्षात ज्या प्रभागांमध्ये ताकद वाढली आहे किंवा अन्य पक्षांमधून माजी नगरसेवकांना घेतले आहे, अशा जागांवर दावा केला आहे.

त्यामुळे आजच्या बैठकीत भाजपच्या १०२ तर शिवसेनेच्या ५५ जागा अशा एकूण १५७ जागांवर एकमत झाले असल्याचे सूत्रांनी सांगितले. शिवसेनेला देवू केलेल्या जागांमध्ये ५-१० जागा मुस्लिम बहुल किंवा कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, अपक्ष आदींनी जिंकलेल्या आहेत. या जागांवर भाजप-शिवसेना कधीही जिंकू शकलेली नाही, अशा पडेल जागा शिवसेनेला देण्यात आल्या आहेत. त्यामुळे ७० जागांवर तिढा असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले. पुढील बैठक दोन-तीन दिवसांत होणार असून त्यात काही जागांचा प्रश्न सोडविला जाईल आणि मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात बैठक होवून उर्वरित जागांबाबत निर्णय होईल, असे ज्येष्ठ नेत्याने स्पष्ट केले. महापालिका विकून खाणाऱ्यांना घरी बसविणे आणि मुंबईकरांना भ्रष्टाचारविरहीत प्रशासन देणे, हे भाजप-शिवसेना युतीच्या जागावाटपाचे सूत्र असल्याचे साटम यांनी सांगितले. भाजप-शिवसेना २२७ जागा लढविणार असून आमदार नवाब मलिक यांच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या राष्ट्रवादी कॉंग्रेसला एकही जागा सोडली जाणार नाही. भाजप-शिवसेना युतीमध्ये कोण किती जागा लढवेल, हे महत्वाचे नाही. महायुतीचा महापौर होईल आणि मुंबईचा रंग बदलण्याचे कारस्थान हाणून पाडले जाईल, असे साटम यांनी स्पष्ट केले.




## कोकाटेंचा राजीनामा अजित पवारांनी स्वीकारला

### कोणत्याही क्षणी अटक होणार !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वीकारला आहे आणि तो मुख्यमंत्र्याकडे पाठवला आहे. यानंतर नाशिक पोलिस मुंबईकडे रवाना झाले आहेत. या ठिकाणी माणिकराव कोकाटे यांना अटक होईल. दरम्यान, माणिकराव कोकाटे सध्या मुंबईतील लिलावती रुग्णालयात आहेत. ज्या ठिकाणाहून त्यांना अटक करण्यासाठी रवाना नाशिक पोलिसांची टीम रखाना झालेला आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर लिलावती रुग्णालयाबाहेर मोठ्या प्रमाणात गार्ड तैनात करण्यात आले आहे.

**नेमकं काय म्हटलंय अजित पवारांनी ?**

> **"माननीय न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील आमचे सहकारी श्री. माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा माझ्याकडे सुपूर्द केला आहे. कायदे-नियम हे सर्वोच्च स्थानी असून ते कोणत्याही व्यक्तीपेक्षा सर्वोतोपरी आहेत, या आमच्या पक्षाच्या दीर्घकालीन भूमिकेनुसार हा राजीनामा तत्त्वतः स्वीकारण्यात आला आहे. संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाहीसाठी श्री. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मा. मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवण्यात आला आहे." ● अजित पवार**

### निवडणूक आणि गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर

## अंबरनाथ शहराला छावणीचं स्वरूप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : अंबरनाथ नगर परिषदेचे मतदान २० डिसेंबरला होणार आहे. त्यापूर्वीच भाजपच्या उमेदवाराच्या कार्यालयावर गोळीबार झाल्यानंतर ठाणे पोलिसांनी सुरक्षा आणि मतदानाच्या पार्श्वभूमीवर कडेकोट बंदोबस्त लागू केला आहे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रापासून १०० मीटर अंतरावर प्रवेश बंदी असेल. तसेच सुमारे १८०० पोलीस अधिकारी आणि कर्मचारी अंबरनाथमध्ये तैनात असणार आहे. तर ४० ठिकाणी पोलिसांचे विशेष लक्ष असणार आहे.**



अंबरनाथ नगर परिषदेसाठी येत्या २० डिसेंबरला मतदान होणार आहे. राज्यात महापालिका निवडणूकांसाठी युतीची चर्चा सुरु असली तरी अंबरनाथ नगरपरिषदेत शिंदे गट विरुद्ध भाजप अशी थेट लढत होत आहे. त्यामुळे भाजप आणि शिंदे गटामध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवारी अंबरनाथमध्ये प्रचारसभा घेण्यासाठी येण्यापूर्वीच मध्यरात्री भाजप उमेदवाराच्या कार्यालयावर गोळीबार झाल्याने खळबळ उडाली. या घटनेनंतर ठाणे जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेविषयी चर्चा सुरु आहे.

मतदान अवघ्या दोन दिवसांवर आल्याने आता ठाणे पोलीस या ठिकाणी १ हजार स्थानिक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी तसेच ८०० अतिरिक्त पोलीस कर्मचारी असा १८०० अधिकारी, कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त तैनात करणार आहेत. मतदान केंद्र परिसरात १०० मीटर अंतरावर प्रवेशबंदी आहे. तीन उपायुक्त आणि साहाय्यक आयुक्तांकडूनही पाहणी केली जाणार आहे. तसेच आयुक्तालय क्षेत्रात मनाई आदेशाही लागू झाले आहे.

## जिल्ह्याच्या ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला बळकटीकरण देणार

### नव्या मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचा निर्धार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला बळकटीकरण तसेच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षण क्षेत्राला उभारी देण्यासाठी सुरु केलेल्या दिशा प्रकल्प पुढे घेऊन जात त्याची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यासह ग्रामीण भागातील गावे टँकरमुक्त करण्यावर भर देणार असल्याची माहिती नव्या मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

ठाणे जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांची बदली झाल्यानंतर या पदाचा अतिरिक्त कार्यभार पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्याकडे सोपविण्यात आला होता. दोन महिन्यानंतर ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी रणजित यादव यांची नियुक्ती झाली.

रणजित यादव यांनी गुरुवारी पदभार स्विकारला. रणजित यादव हे २०२२ च्या तुकडीतील 'आयएएस' अधिकारी आहेत. यापूर्वी ते रणजित यादव सहायक




जिल्हाधिकारी, गडचिरोली उपविभाग तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली या पदावर कार्यरत होते.

गडचिरोली जिल्ह्यातील 'आदि कर्मयोगी' अभियानांतर्गत जिल्ह्याला राष्ट्रपतीकडून उत्कृष्ट जिल्हा म्हणून गौरव मिळण्यात यादव यांचा सक्रिय सहभाग होता. तसेच चामोर्शी एमआयडीसी रेल्वे आणि सिंचन प्रकल्पांसाठी भूसंपादन, 'पीएम जनमन', 'धरती आबा अभियान' यांसारख्या आदिवासी कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच ई-ऑफिस आणि ई-गव्हर्नन्स उपक्रम राबविण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे.

ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार स्विकारताना त्यांनी ठाणे जिल्ह्यातील प्रशासन अधिक गतिमान, विकासाभिमुख करण्याचा ठाम संकल्प व्यक्त केला. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात यासाठी प्रशासनात कार्यक्षमता, वेळबद्धता आणि फलनिष्पत्ती करण्यासाठी भर देण्यात येईल.

जिल्हा परिषदेच्या शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला आणि बालकल्याण आदि विभागांमध्ये समन्वय साधून तंत्रज्ञानाधारित आणि परिणामकारक प्रशासन राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. नागरिकांच्या समस्या संवेदनशीलतेने ऐकून त्यावर तत्काळ आणि सकारात्मक कार्यवाही केली जाईल तसेच अधिकारी आणि कर्मचारी यांचे सहकार्य, अनुभव आणि नवकल्पनांचा योग्य उपयोग करून ठाणे जिल्हा परिषदेच्या विकासाला नवे बळ देण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी सज्ज

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या निवडणुकीसाठी पालिका प्रशासन सज्ज झाले असून पालिकेच्या ३१ पॅनल मधील निवडणूकी साठी १५८३ मतदान केंद्रे असणार आहेत. या निवडणुकीसाठी नऊ निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती केली असून त्यांच्या मदतीला प्रत्येकी तीन सहाय्यक निवडणूक अधिकारी असणार आहे. प्रथमच या निवडणुकीच्या मतमोजणी एकाच ठिकाणी न होता नऊ ठिकाणी मतदानाची मतमोजणी केली जाणार असल्याची माहिती पालिका आयुक्त तथा प्रशासक अभिनव गोयल यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश




गोडसे, उपायुक्त समिर भूमकर, वंदना गुळवे, सचिव किशोर ठाकूर, संजय जाधव उपस्थित होते.

यंदाच्या निवडणुकी साठी खर्चासाठी पालिकेच्या अर्थसंकल्पात १७ कोटी रुपयाच्या निधीची तरतूद केली असून या तरतुदींच्या निधीतून निवडणुकीचा खर्च केला जाणार आहे. पालिका क्षेत्रात एकूण १५ लाख ५१ लाख लोकसंख्या असून १२२ सदस्य निवडीसाठी चार सदस्यांचे २९ पॅनल व तीन सदस्यांचे दोन पॅनल असे ३१ पॅनल मधील १४ लाख २४ हजार ७४८ एकूण मतदार आहेत. या मध्ये पुरुष ७ लाख ४५ हजार ४७९, स्त्रिया ६ लाख ७८ हजार ७२६ व इतर ५५२ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. ३१ पॅनल मध्ये एकूण १५८३ मतदान केंद्र असणार आहेत. एका मतदान केंद्रावर चार अधिकारी कर्मचारी असे एकूण ६१५२ कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. महापालिकेचे अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी वगळता राज्य सरकारच्या अन्य विभागातील कर्मचारी वर्ग निवडणुकीसाठी कार्यरत असणार आहेत.

## पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज डोंबिवलीत भाजप कार्यकर्ता संवाद मेळावा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - शिवसेना शिंदे गटाकडून कल्याण डोंबिवली पालिकेत महायुतीसाठी जोरदार आग्रह धरला जात आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण, डोंबिवलीतील भाजप कार्यकर्ते मात्र कल्याण डोंबिवली पालिका निवडणूक भाजपने स्वबळावर लढवावी, याविषयी आग्रही आहेत. अंबरनाथ, बदलापूर नगरपालिका निवडणुकांच्या मतमोजणीनंतर तेथील भाजपचे संख्या बळ पाहून कल्याण डोंबिवलीत भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी पालिका निवडणूक स्वबळाने की महायुतीने लढवावी याविषयी निर्णय घेण्याची शक्यता आहे. कल्याण, डोंबिवलीत भाजपची ताकद वाढली आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिका निवडणूक भाजपने स्वबळावर लढवावी याविषयी कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. याची चुणूक म्हणून कल्याण जिल्हा भाजपने पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज (शुक्रवारी) संध्याकाळी डोंबिवली पश्चिमेत 'तुमची आमची भाजपा सर्वांची या शीर्षकाखाली कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित केला आहे. या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.








| वेळ | स्पर्धा | ठिकाण |
|---|---|---|
| सकाळी ०९.३० ते १०.३० | मेहंदी स्पर्धा | कार्यक्रम हॉल (निबंध व पोस्टर परीक्षकांकडे जमा करणे) |
| सकाळी १०.०० ते ११.०० | निबंध स्पर्धा | |
| सकाळी १०.०० ते ११.०० | पोस्टर मेकिंग स्पर्धा | |
| सकाळी ११.०० ते ११.३० | नेल आर्ट स्पर्धा | रूम नं. ०१ तळ मजला |
| सकाळी ११.३० ते १२.३० | रांगोळी स्पर्धा | पहिला मजला पॅसेज |
| दुपारी १२.०० | पाककला स्पर्धा | तळ मजला पॅसेज |

| वेळ | स्पर्धा | ठिकाण |
|---|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० | काव्यवाचन स्पर्धा | कार्यक्रम हॉल |
| सकाळी १०.०० ते ११.०० | गायन स्पर्धा | कार्यक्रम हॉल |
| सकाळी ११.०० वा. | वक्तृत्व स्पर्धा | कार्यक्रम हॉल |
| सकाळी ११.३० वा. | मोबाईल फोटोग्राफी स्पर्धा | कार्यक्रम हॉल (परीक्षकांकडे जमा करणे) |
| सकाळी ११.३० ते १२.३० | पारंपरिक वेशभूषा स्पर्धा | कार्यक्रम हॉल |
| सकाळी ११.३० ते १२.३० | मिस्टर अँड मिस जीवनदीप | कार्यक्रम हॉल |

# भिवंडीत होमगार्ड वर्धापनदिन उत्साहात साजरा




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : आपत्ती व्यवस्थापन,पोलिसांना सहाय्य, कायदा-सुव्यवस्था,नागरिक संरक्षण आणि समाजसेवेत होमगार्ड हे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतात त्यामुळे ते नेहमी कौतुकास प्राप्त आहेत त्यांना नेहमी सहकार्य करावे असे आवाहन बजरंग दलाचे नेते संदीप भगत यांनी केले आहे.

महाराष्ट्र होमगार्डचा ७९ वा वर्धापन दिन नुकताच भिवंडी पथकाच्यावतीने कांबे जिल्हा परिषद शाळेत जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अप्पर पोलीस अधिक्षक अनमोल मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी शाळा परिसरात वृक्षारोपण व शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी बजरंग दलाचे नेते संदीप भगत, सरपंच आरती भोईर,जिल्हा परिषद कांबे शाळेच्या मुख्याध्यापिका सपना जाधव व सर्व शाळेचे शिक्षक कर्मचारी व सर्व शाळेतील विद्यार्थी,व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी भिवंडी होमगार्ड पथकाचे प्र.समादेशक रंजित महादेव कांबळे यांच्यासह सर्व होमगार्डनी अथक परिश्रम घेतले.

# आचार संहिता लागू झाल्यापासून शहरातील अनधिकृत पोस्टर्स ठाणे महापालिकेने हटविले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे (18) : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरातील अनधिकृत जाहिराती, बॅनर्स व पोस्टर्स हटविण्याची मोहीम ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत सुरू करण्यात आली. दिनांक 15 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 4.00 वाजल्यापासून ते दिनांक 18 डिसेंबर 2025 पर्यंत शहरातील एकूण 3778 अनधिकृत पोस्टर्स, भित्तीपत्रके व बॅनर्स हटविण्यात आले आहेत.

दिनांक 15 जानेवारी 2026 रोजी मतदान होणार असून, त्या पार्श्वभूमीवर शहरात लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यात येत आहे. निवडणूक विभागाचे उपायुक्त श्री. उमेश बिरारी यांच्या सूचनेनुसार सहायक आयुक्त सोपान भाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील 9 प्रभाग समित्यांमधील पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत अनधिकृत बॅनर्स, वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे होर्डिंग्ज, भित्तीपत्रके व पोस्टर्स हटविण्याची कारवाई करण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींची नावे असलेल्या विकासकामांच्या कोनशीला झाकण्याची कार्यवाही महापालिकेच्यावतीने करण्यात आली.




ठाणे शहरातील 9 प्रभागसमितीमध्ये करण्यात आलेल्या कारवाईमध्ये 630 भित्तीपत्रके, 897 पोस्टर्स, 83 कटआऊटस्, 1266 बॅनर्स, 602 फ्लॅग अशा एकूण 3778 अनधिकृत जाहिराती हटविण्यात आल्या.

दि. 15 डिसेंबर 2025 ते दि. 18डिसेंबर 2025 दरम्यान करण्यात आलेल्या कारवाईचा प्रभागनिहाय तपशील पुढीलप्रमाणे :

नौपाडा–कोपरी प्रभाग समिती – 754
वागळे प्रभाग समिती – 512
लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती – 508
वर्तकनगर प्रभाग समिती – 483
माजिवडा–मानपाडा प्रभाग समिती – 327
उथळसर प्रभाग समिती – 707
कळवा प्रभाग समिती – 76
मुंब्रा प्रभाग समिती – 179
दिवा प्रभाग समिती – 232

# रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

**उत्तर प्रदेशातील मथुरा एक्सप्रेस वे वर मंगळवारी मृत्यूचे तांडव पाहायला मिळाले. दाट धुक्यामुळे पहाटे साडे चारच्या सुमारास आठ बस आणि तीन मोटारी एकमेकांवर आदळल्या. त्यानंतर वाहनांनी पेट घेतला यामध्ये २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला तर ५९ जण गंभीर जखमी झाले. या अपघाताने देशभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात असा भीषण अपघात घडल्याची ही पहिली वेळ नाही याआधी असे अनेक अपघात देशात घडले असून त्यात लाखो लोकांचा जीव गेला आहे.**



गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!


श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५


## माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी

# जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांचे प्रशिक्षण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांना माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींबाबत जिल्हा परिषद, ठाणे ग्रामपंचायत विभाग अंतर्गत अधिकाऱ्यांना सुस्पष्ट व अद्ययावत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद, ठाणे येथील बी. जे. हायस्कूल येथे हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले. सदर प्रशिक्षण कार्यक्रम दोन सत्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणास भिवंडी, कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय



अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमास प्रकल्प संचालक पंडित राठोड, गटविकास अधिकारी भिवंडी गोविंद खामकर, सहाय्यक गटविकास अधिकारी अंबरनाथ निता खोटरे तसेच विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षणामध्ये यशदामार्फत तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून सूत्रसंचालक दादू बुळे, तज्ञ प्रशिक्षक (माहिती अधिकार) रेखा साळुंखे यांनी माहिती अधिकार कायद्यातील कलमे, वेळापत्रक, अपील प्रक्रिया, निर्णय लेखन, तसेच प्रत्यक्ष प्रकरणांवरील मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणादरम्यान माहिती अधिकार कायद्याच्या अचूक अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या जबाबदाऱ्या, कायदेशीर बाबी, चुका टाळण्यासाठीचे उपाय आणि पारदर्शक प्रशासनाचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशिक्षणार्थींनी शंका विचारून समाधानकारक उत्तरे मिळाल्याचे मत व्यक्त केले.

**"माहिती अधिकार कायदा हा पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनाचा कणा आहे. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांना या कायद्याची सखोल समज असणे अत्यंत आवश्यक आहे. आजचे प्रशिक्षण केवळ औपचारिक नसून प्रत्यक्ष कामात उपयोगी ठरेल असे असून, यामुळे माहिती अधिकार कायद्याची प्रभावी अंमलबजावणी निश्चितच साध्य होईल." - प्रकल्प संचालक पंडित राठोड**

सदर प्रशिक्षणामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्यांचे ज्ञान व आत्मविश्वास वाढून, भविष्यात माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

**"या प्रशिक्षणातून माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदी, वेळेचे बंधन आणि निर्णय प्रक्रियेबाबत स्पष्टता मिळाली. प्रत्यक्ष उदाहरणांमुळे कायदा समजणे सोपे झाले असून, पुढील काळात माहिती अर्ज व अपीलांवर अधिक योग्य व वेळेत कार्यवाही करता येईल, असा आत्मविश्वास आम्हाला मिळाला आहे."**
**– प्रशिक्षणार्थी ग्रामपंचायत अधिकारी भिवंडी गणेश पडवळ**

# भिवंडी पालिकेच्या कौशल्य व लघु उद्योजकता प्रशिक्षणाला महिलांचा प्रतिसाद



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगरपालिका व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यात कौशल्य व लघुउद्योजकता विकास उपक्रम राबविण्यासाठी ३ डिसेंबर रोजी सामंजस्य करार करण्यात आला होता. यामध्ये अल्प शिक्षित महिलांना रोजगार व स्वयंरोजगार यासाठी निरनिराळे अभ्यासक्रम दिले जाणार आहेत.त्यासाठी पालिका मुख्यालयात नाव नोंदणी सुरू असून तेथे शेकडो महिला नाव नोंदणीसाठी येत प्रतिसाद देत आहेत.

महिला कल्याण आणि उद्योजकता सक्षमीकरणावर केंद्रित उपक्रमामध्ये फॅशन, ज्वेलरी डिझाईन,ब्यूटीक व ब्युटी अँड वेलनेस सेवा,फूड प्रोसेसिंग व पाककला संबंधित उत्पादने,हस्तनिर्मित साबण;मेणबत्ती; नॅपकिन; बुके व अरोमा उत्पादने,पॉवरलुम उद्योग आधारित कौशल्य विकास व लॉजिस्टिक ऑपरेशन्स आणि डेटा एन्ट्री हे प्रशिक्षण महिलाना दिले जाणार आहे.त्यासाठी मागील आठवड्यात पालिका मुख्यालयातील तळमजल्यावर महिलांसाठी मार्गदर्शन व नाव नोंदणी सुरू केली आहे.आठवडा भरात या ठिकाणीं 200 हून अधिक महिलांनी नाव नोंदणी करीत या उपक्रमास प्रतिसाद दिला आहे.या नाव नोंदणी झालेल्या महिलांना भिवंडी शहरातच प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे.

# धनश्री तळवलकर यांना सरदार पटेल विद्यापीठाची डि.लिट. पदवी प्रदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण : स्वाध्याय परिवाराच्या प्रमुख आणि पद्मविभूषण पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या सुकन्या श्रीमती धनश्री तळवलकर यांना नुकतेच मानद डॉक्टर ऑफ लेटर्स, अर्थात डि. लिट्. या पदवीने सन्मानित करण्यात आले.**

**गुजरातच्या वल्लभ विद्यानगर येथील सुप्रसिद्ध सरदार पटेल विद्यापीठाने ही मानद पदवी सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल धनश्रीदीदींना प्रदान केली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतिदिनी म्हणजे १५ डिसेंबरच्या दिवशी गुजरातचे राज्यपाल आदरणीय आचार्य देवव्रत यांच्या हस्ते सरदार पटेल विद्यापीठाच्या दीक्षांत समारोह सोहळ्यात वल्लभ विद्यानगर, आणंद येथे धनश्रीदीदींना ही पदवी अर्पण करण्यात आली. वैश्विक स्वाध्याय परिवारासाठी तसेच महाराष्ट्रासाठी दीदींना ही पदवी अर्पण होणे हा**




**अत्यंत आनंदाचा क्षण आहे हे निश्चित. पांडुरंगशास्त्री किंवा धनश्रीदीदी यांनी कुठला पुरस्कार किंवा सन्मान मिळावा या अपेक्षेने कधीच कुठले सत्कार्य किंवा रचनात्मक कार्य केले नाही. त्यामुळेच अशा निरपेक्ष, निःस्वार्थ भावनेने विधायक कार्य करणाऱ्या दीदींसारख्या व्यक्तिमत्त्वाचा एका सुप्रतिष्ठित विद्यापीठाने गौरव करणे ही वस्तुतः खूप अभिमानाची गोष्ट आहे.**

**या पदवी अर्पण समारोहानंतर त्याच दिवशी सायंकाळी नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड (NDDB) यांच्या भावपूर्ण निमंत्रणावरून धनश्रीदीदींचे 'आयुष्य सुंदर करण्यासाठी गीतेची शिकवण' या विषयावर एक व्याख्यान नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले. आपल्या गीतेवरील एक तासापेक्षा अधिकच्या प्रवाही संवादाने दीदींनी बोर्डाचा कर्मचारी वर्ग, अधिकारी वर्ग तसेच उपस्थित असलेल्या स्वाध्याय परिवारातील प्रतिनिधींना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.**

## वाशिंद येथे

# जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** शहापूर तालुका चेस असोसिएशन व आर.एल. चेस अकॅडमी' च्या वतीने वासिंद येथे जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील बुद्धीबळ खेळाडूंना प्रोत्साहन व या खेळाला उत्तेजन मिळावे या करिता शहापूर तालुका चेस असोसिएशन व आर.एल. चेस अकॅडमीच्या वतीने रविवार दि.21 डिसेंबर 2025 रोजी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर, स्पर्धा 5 वयोगटात होणार असून यामध्ये 7,10,14,18 व 22 अशा वर्ष व योगटा खाली पार पडणार आहे.

यामध्ये प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांना 4 चषक, 4 पदक तर प्रत्येक सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सदर स्पर्धा येथील न्यू आयडियल स्कूल येथे संपन्न होणार असून यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन चेस मास्टर व असोसिएशनचे अध्यक्ष रुपेश बोराडे यांनी केले आहे.

# बदलापूरच्या प्राप्ती पातकरला परदेशात मास्टर डिग्री

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद** : बदलापूर येथील प्राप्ती पातकर हिने परदेशात जाऊन मास्टर डिग्री प्राप्त केल्याने तीचे सर्वच स्तरातून कौतूक होत आहे.

प्राप्ती पातकर ही माजी नगरसेवक अविनाय पातकर यांची मुलगी आहे. शिक्षणाची मुळातच आवड असलेल्या प्राप्तीने शिक्षण क्षेत्रात कधीही आपयश पाहिले नाही. शिक्षणात उतूंग भरारी घेण्याचे स्वप्न तीने उराशी बाळगले होते. आपले वडील अविनाश



पातकर यांच प्राप्तीला पाठबळ असल्याने परदेशात जाऊन मास्टर डिग्री प्राप्त करण्याच्या ईरादाने तीने परदेशात जाण्याचा निर्णय घेतला होता. आई वडीलांच पाठबळ व शिक्षणावर असलेला आत्मविश्वास या जोरावर जाऊन प्राप्तीने मास्टर डिग्री प्राप्त केल्याने तीचे वैश्य समाजाबरोबरच सर्वच स्थरातून कौतूक होत आहे.

# भविष्यवेध



**शुक्रवार**
**१९ डिसेंबर २०२५**

**मेष**
अधिकार गाजवण्याच्या तुमच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवा; त्याचा कामावर परिणाम होऊ शकतो. लोकांना जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी मिळू शकते.

**वृषभ**
येणाऱ्या सर्व आव्हानांना धैर्याने तोंड दिले तर तुम्हाला यश मिळेल. तथापि, तुमचे भविष्य सुधारण्यासाठी तुम्हाला यावेळी आळस सोडावा लागेल.

**मिथुन**
एखाद्या कंपनीत मुलाखतीसाठी आमंत्रित केले जाऊ शकते. इच्छुक लेखकांचा आजचा दिवस चांगला जाऊ शकतो . लेख किंवा पुस्तक प्रकाशित होऊ शकतं.

**कर्क**
तुमच्या कुटुंबासोबत संध्याकाळ घालवाल. व्यावसायिकांना आज आर्थिक फायदा होण्याची अपेक्षा आहे. पण, कोणताही करार करताना नीट विचार करा.

**सिंह**
कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी हाथी घेतलं तर ते सहज साध्य होईल. एखाद्या महत्त्वाच्या कामाच्या पूर्ततेबद्दल लोक अभिनंदन करण्यासाठी सतत येत राहतील.

**कन्या**
तुम्ही एखाद्या जुन्या मित्राला घरी भेटू शकता, जिथे तुम्ही वैयक्तिक समस्यांवर चर्चा कराल. बोलून बरं वाटेल. आजता दिवस खास जाईल.

**तुळ**
गेल्या काही दिवसांपासून जे काम पूर्ण करण्याचा विचार करत होता ते आज कोणाच्या तरी मदतीने पूर्ण होईल. इतरांच्या कामावर मत व्यक्त करणं टाळा .

**वृश्चिक**
इतरांशी बोलताना योग्य भाषेचा वापर करा. उगाच भांडण ओढवून घेऊ नका. कोणतंही काम करताना मन शांत ठेवलं तर तुमचं काम सहज यशस्वी होईल.

**धनु**
घाईघाईने काम केले तर सर्व काही बिघडेल. अविवाहित लोकांना आज मागणी येऊ शकते. तुम्ही खूप दिवसांपासून प्रयत्न करत आहात तो प्रयत्न यशस्वी होईल.

**मकर**
एकेकाळी तुम्ही ज्या प्रयत्नांना व्यर्थ मानत होता ते आज यशस्वी होतील. तुम्हाला फायदा होईल असा व्यवसाय आज सुरू कराल. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाल.

**कुंभ**
कंत्राटदारांचा दिवस चांगला जाईल. नवीन कॉन्ट्रॅक्टदेखील मिळू शकतं. प्रवास ऑफिसच्या कामाशी संबंधित असू शकतो. दूरच्या नातेवाईकाची भेट होऊ शकते.

**मिन**
तुम्ही मंदिरात किंवा धार्मिक कार्यक्रमात जाण्याचा प्लान आखू शकता. आज आनंद मिळवण्यासाठी, तुम्हाला तुमच्या स्वभावात काही बदल करावे लागतील.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# खासदार श्रीकांत शिंदेंच्या मतदार संघातील कळव्यात भाजपकडून निम्म्या जागांची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघातील कळवा भागात भाजपने महापालिका निवडणूकीत ५० टक्के जागांसाठी मागणी केली आहे. भाजपचे बळ कळव्यात वाढले आहे. त्यामुळे आम्ही जागेची मागणी करत आहोत, असे भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. त्यामुळे आता भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) युतीमधील धुसफूस उघड होत आहे.**




कल्याण लोकसभा मतदारसंघातील कळवा शहर हे ठाणे महापालिका क्षेत्रात येते. या भागातून शिवसेना आणि राष्ट्रवादीचे नगरसेवक निवडून येत होते. सध्या या क्षेत्रात शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) बळ आहे. कळवा पूर्व भागात उत्तर भारतीय रहिवाशांचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे भाजपने देखील आता कळवा भागात पाय रोवण्यास सुरुवात केली आहे.

ठाण्यात भाजप आणि शिंदे गटामध्ये युती बाबत चर्चा सुरु असतानाच, कळवा पूर्व आणि पश्चिम येथील भाजपच्या मंडळाध्यक्षांनी एकत्र येऊन युतीमध्ये निवडणूक लढविल्यास कळव्यात एकूण जागांपैकी ५० टक्के जागा मिळाव्यात अशी मागणी केली. कळवा पश्चिमचे मंडळ अध्यक्ष तेजस चंद्र मोरे आणि पूर्वचे मंडळ अध्यक्ष कृष्णकुमार यादव यांच्यासह भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पत्रकार परिषद घेऊन मागणी केली.

यामध्ये त्यांनी सांगितले की, कळवा शहरात भाजपचे बळ वाढले आहे. भाजपकडे सक्षम उमेदवारही आहेत. वरिष्ठांनी युती केल्यास आम्हाला कळवा शहरात ५० टक्के वाटा हवा. मागील निवडणूकीत आम्ही दुसऱ्या क्रमांकावर होतो. आता समोरील पक्षांची दोन शकले झाली आहेत. त्यामुळे १६ पैकी आठ जागा आम्हाला मिळाव्यात असे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

वरिष्ठांवर आम्हाला विश्वास आहे, काहीजण इतर पक्षातून आमच्या मित्र पक्षात आले आहेत. कळव्यात आम्ही खूप कामे केली आहेत असेही त्यांनी सांगितले. २०१७ च्या निवडणूकीत आम्ही १ लाख ३५ हजार मतदान घेतले होते. तर आमच्या प्रतिस्पर्धी पक्षाने १ लाख ८० हजार मतदान घेतले होते. ५० हजारांचा फरक आम्ही मोडणार आहोत. हा फरक जास्त मोठा नाही असेही ते म्हणाले. आम्ही पक्षाची भूमिका घेऊन चालणारे आहोत. एकला चलो रे चा नारा आम्ही देणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**
**(मालमत्ता व्यवस्थापन)**

**जाहीर प्रकटन**

**विषय :- कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत आदर्श आचार संहितेचे पालन करणेबाबत.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५,दि. १५ डिसेंबर २०२५. रोजीच्या आदेशानुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. त्याअनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिका मालमत्ता व्यवस्थापन विभागामार्फत खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवर निवडणूक कालावधीत राजकीय व इतर जाहिरात प्रसिध्द करावयाची असल्यास एजन्सी/व्यक्ती/संस्था यांनी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व महानगरपालिका मालमत्ता विभागाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे.

महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या होर्डिंगधारकांची मागील व चालू सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील जाहिरात फी थकीत असेल अशा होर्डिंगधारकांनी त्वरित जाहिरात फीचा भरणा करावा. जाहिरात प्रसिध्द करावयाची असल्यास समन्यायिक व चक्राकार (रोटेशन) पध्दतीने प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य संबंधित कार्यक्षेत्रातील निवडणूक निर्णय अधिकारी व महानगरपालिका मालमत्ता विभागाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगीनंतरच राजकीय अथवा इतर जाहिराती प्रसिध्द कराव्यात.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ "आदर्श आचार संहितेच्या" पार्श्वभूमीवर जाहिरात फलकावर मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही जाहिरात प्रदर्शित करणेस पुर्णपणे प्रतिबंध करणेत येत असून जाहिरात प्रदर्शित करणेपुर्वी आदर्श आचार संहितेचे तंतोतंत पालन होईल याची आपण दक्षता घ्यावी. तसेच यापूर्वी प्रदर्शित करण्यात आलेल्या अशा स्वरुपाच्या राजकीय पार्श्वभूमी असलेल्या जाहिराती आपण त्वरीत काढून घ्याव्यात.

ज्या होर्डिंगधारकांना परवानगी नसेल व मागील व चालू सन २०२५-२६ च्या आर्थिक वर्षातील जाहिरात फी थकित आहे. त्यांनी जाहिरात प्रसिध्द केल्यास आचारसंहितेचा भंग समजून संबंधित एजन्सी/व्यक्ती/संस्था मालकावर गुन्हा दाखल करुन होर्डिंग निष्कासनाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**उप आयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन)**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

**जावक क्रमांक :**
**कडोंमपा/जसंवि/मुका/८१२**
**दिनांक :- १८/१२/२०२५**



# गांजाची तस्करांच्या आंतरराज्य टोळीचा छडा

## सात जण अटकेत, अन्य सातांचा शोध सुरू

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - गांजाची तस्करी करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा छडा लावण्यात महात्मा फुले पोलीस ठाणे आणि कल्याण वाहतूक विभागाच्या पोलिसांना यश आले आहे. या टोळीतील एकूण १४ तस्करांपैकी सात जणांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. सात फरार तस्करांचा पोलीस शोध घेत आहेत. या टोळीला मकोका लावण्यात आला आहे. मकोका अंतर्गत कल्याण पोलिसांनी केलेली ही दुसरी मोठी कारवाई आहे, असे कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

अंमली पदार्थ घेऊन येणारे एक संशयास्पद कल्याणमधील वालधुनी पुलावरून येत आहे. अशी गुप्त माहिती ऑगस्टमध्ये कल्याण पोलिसांना मिळाली होती. महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीरामसिंग परदेशी, वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद झोगडे यांच्या पथकाने वालधुनी भागात रात्रीच्या वेळेत सापळा लावला होता. वालधुनी पुलावरून छत्तीसगड आरटीओ मंजूर असलेली वाहन क्रमांकाची एक मोटार जात होती.

पोलिसांनी या वाहनाला थांबविण्याचा प्रयत्न केला. तो वेगाने पुढे गेला. हीच संशयित मोटार असावी म्हणून पथकाने मोटारीचा पाठलाग केला. हवालदार सोनवणे यांनी मोटारीचा पाठलाग करून त्या वाहनाला अडविण्याचा प्रयत्न केला. मोटार चालकाने सोनवणे यांच्या अंगावर वाहन घालून त्यांना जीव मारण्याचा प्रयत्न केला. पथकाने ही कार शिताफीने अडवली. त्यात ३५ किलो गांजा, गावठी पिस्तुल आढळले होते, असे उपायुक्त झेंडे यांनी सांगितले.

या मोटारीतून पोलिसांनी मोहम्मद आसिफ, मोहम्मद शेख, फैजान शेख, समीर अली, आसिफ सय्यद यांना अटक केली होती. त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी भिवंडी, नागपूर, ओरिसा राज्यातून शाहिद अब्दुलगनी शेख, शाहीद शेख, रवींद्र मिर्धा यांना अटक केली होती. उर्वरित सात फरार तस्करांचा पोलीस शोध घेत आहेत. या १४ जणांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ही टोळी नागपूर, अमरावती, भंडारा, ठाणे जिल्ह्याच्या विविध भागात अंमली पदार्थांची तस्करी करत असल्याचे तपासात पुढे आले आहे. या आरोपींविरूध्द नागपूर शहर पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ तस्करी प्रकरणी एकूण ४० हून अधिक गुन्हे दाखल आहेत.

# रेल्वे कामासाठी डोंबिवलीत रात्रीची वाहतूक बंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

डोंबिवली पश्चिमेतील मोठागाव रेल्वे गेट परिसरात अत्यावश्यक रेल्वे संबंधित कामासाठी वाहतूक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. १९ ते २१ डिसेंबर २०२५ असे तीन दिवस हे निर्बंध असणार आहेत. ठाणे वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ ते २१ डिसेंबर या कालावधीत मध्यरात्री १२.०१ ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत हे निर्बंध लागू असतील. ठाणे पोलिसांनी जारी केलेल्या वाहतूक नियंत्रण आदेशानुसार, एक्सप्रेस फाइट रेल्वे कन्सोर्टियमकडून मोठागाव रेल्वे गेट परिसरात रेल्वे ट्रकसंबंधित काम केले जाणार आहे. कामाच्या कालावधीत मोठागाव रेल्वेगेट ते रेतीबंदर रोडच्या आसपासच्या भागात दोन्ही बाजूंनी ये-जा पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

**■ कोणते मार्ग बंद राहणार?**

- स्वामीनारायण सिटी चौक ते मोठागाव रेल्वे गेट.
- मोठागाव रेल्वे गेट ते नवीन कोपरगाव क्रॉस रोडवरील पाण्याच्या टाकीपर्यंतचा मार्ग
- रेतीबंदर चौकातून (पंडित दीनदयाळ उपाध्याय मार्ग व रेटिबंदर रोडवरून) मोठागाव रेल्वे गेटकडे जाणारी वाहतूक

**■ पर्यायी मार्ग कोणते?**

वाहनचालकांनी नवीन कोपरगाव क्रॉस रिंग रोड मार्गे वळसा घ्यावा. रेतीबंदर चौकातून येणाऱ्या वाहनांना पंडित दीनदयाळ उपाध्याय मार्ग येथून महात्मा गांधी रोड त्यानंतर कोपर रोड पुढे नवीन कोपरगाव क्रॉस रिंग रोड मार्गे वळवले जाणार आहे.

**■ आपत्कालीन सेवांना सूट**

ठाणे शहर वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी स्पष्ट केले की, "हे निर्बंध मोटार वाहन कायद्यानुसार लागू करण्यात आले असून, रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलीस वाहने, ग्रीन कॉरिडॉर सेवा, ऑक्सिजन वाहतूक आणि अन्य अत्यावश्यक सेवा या आदेशातून वगळण्यात आल्या आहेत."

**■ नागरिकांना आवाहन**

वाहतूक पोलिसांनी नागरिकांना प्रवासाचे नियोजन आधीच करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आणि प्रत्यक्ष ठिकाणी तैनात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. "सूचित केलेल्या वेळेत या परिसरातून प्रवास टाळल्यास वाहतूक कोंडी टाळता येईल," असेही पोलिसांनी सांगितले आहे.

## तारघर , गव्हाण स्थानके अखेर कार्यान्वित

# उरण-बेलापूर मार्गावर 10 नव्या लोकल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

नवी मुंबई आणि उरण परिसरातील रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. उरण ते नवी मुंबई लोकल सेवेच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली असून, सोमवारीपासून या मार्गावर 10 नव्या लोकल फेऱ्या सुरू झाल्या आहेत. त्याचबरोबर दीर्घकाळ प्रतीक्षेत असलेली तारघर आणि गव्हाण ही दोन नवी रेल्वे स्थानकेही अखेर कार्यान्वित झाली आहेत. या निर्णयामुळे मुंबईकर आणि नवी मुंबईकरांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ, जलद आणि आरामदायी होणार आहे. 2024 मध्ये उरण ते नवी मुंबई दरम्यान लोकल सेवा सुरू झाली होती. मात्र, या मार्गावरील काही स्थानकांची कामे अपूर्ण असल्याने त्या ठिकाणी रेल्वेचा थांबा देण्यात आला नव्हता. आता तारघर आणि गव्हाण ही दोन्ही स्थानके सुरू झाल्याने या मार्गावरील रेल्वे कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळाली आहे. दररोज सुमारे 14 ते 15 हजार प्रवासी या मार्गावरून ये-जा करतात. पहाटे लवकर आणि रात्री उशिरा लोकल सेवा सुरू करण्याची मागणी सातत्याने होत होती, त्याला आता सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. नव्या वेळापत्रकानुसार उरण आणि बेलापूर येथून पहिली लोकल सकाळी 5.30 वाजता सुटणार असून, शेवटची लोकल रात्री 10.30 वाजता धावणार आहे. बेलापूर स्थानकावरून पहिली लोकल सकाळी 5.45 वाजता, तर शेवटची लोकल रात्री 10.15 वाजता सुटेल. नेरूळ स्थानकावरून सकाळी 6.05 वाजता पहिली लोकल उपलब्ध होईल, तर शेवटची लोकल रात्री 9.30 वाजता सुटणार आहे.

# अंबरनाथ निवडणुकीच्या प्रचार तोफा आज थंडावणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ, ता. १८** : अंबरनाथ नगरपरिषद निवडणुकीसाठी अवघा एक दिवस शिल्लक असून, शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी प्रचाराची अंतिम फेरी गाठली असून, गल्लीबोळात आणि वसाहतींमध्ये प्रचाराचा धुरळा उडताना दिसत आहे.

सध्या अंबरनाथमध्ये पहाटेपासून पदयात्रा, दुपारच्या वेळी गाठीभेटी आणि संध्याकाळी कोपरा सभांचा धडाका सुरू आहे. उमेदवार स्वतः मतदारांच्या घराघरांत पोहोचून पाणीप्रश्न, रस्ते, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि युवकांचे प्रश्न या मुद्द्यांवर भर देत आहेत. शहरात ठिकठिकाणी लागलेले बॅनर, झेंडे आणि घोषणांमुळे संपूर्ण परिसर राजकीय रंगात न्हाऊन निघाला आहे. डिजिटल माध्यमांचाही पुरेपूर वापर होत असून सोशल मीडियावर व्हिडिओ आणि लाइव्ह संवादाचा पाऊस पडत आहे. आता सर्वांचे लक्ष मतदानाच्या दिवसाकडे लागले असून, अंबरनाथचा 'मतदार राजा' कोणाच्या पारड्यात आपले मत टाकतो आणि शहराच्या राजकीय भवितव्याचा फैसला कोणाच्या बाजूने लागतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

**दिग्गजांची उपस्थिती आणि जाहीर सभा**

निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. भाजप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा आणि खासदार रवी किशन यांचा रोड शो आयोजित केला होता. शिवसेना शिंदे गटाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेची शहरात मोठी चर्चा आहे.

**प्रशासन सतर्क, मतदारांमध्ये उत्सुकता**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शहरात अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. विशेषतः संवेदनशील भागांत पोलिसांची करडी नजर आहे. दुसरीकडे, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी ठिकठिकाणी पथनाट्यांद्वारे जनजागृती केली जात आहे. तर 'यंदा बदल हवा' आणि 'विकासाला प्राधान्य देणाराच प्रतिनिधी हवा,' अशा प्रतिक्रिया अंबरनाथच्या मतदारांकडून उमटत आहेत.

# स्वबळाचा नारा देता देता शिंदे सेना - भाजप युतीत लढणार

**पुढील बैठकीत शिंदे सेनाच जागा वाटपाचा प्रस्ताव देणार**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : महायुतीची घोषणा झाल्यानंतर ठाण्यात शिंदे सेना आणि भाजपच्या समन्वय समितीची पहिलीच बैठक बुधवारी भाजपच्या कार्यालयात पार पडली. ठाण्यात शिंदे सेनेकडे अधिकचे नगरसेवक असल्याने त्यांनी जागा वाटपात योग्य तो सन्मान राखावा, अशी अपेक्षा भाजपच्या नेत्यांनी व्यक्त केली आहे. असे असले तरी पुढील बैठकीत शिंदे सेनाच जागा वाटपाचा प्रस्ताव देणार असल्याचेही स्पष्ट झाले तसेच ठाणे महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकेल, महापौर महायुतीचाच बसेल आणि ११० पेक्षा अधिक जागा महायुतीच्या येतील, असा दावा यावेळी दोनही पक्षांकडून करण्यात आला. परंतु महायुतीचा घटक असलेला अजित पवार गटाला या बैठकीला पाचारण करण्यात न आल्याचे दिसून आले.

स्वबळाचा नारा देता देता ठाण्यात शिंदे सेना आणि भाजप आता युतीत लढणार आहे. वरीष्ठ पातळीवर निर्णय झाल्यानंतर बुधवारी झालेल्या समन्वय समितीच्या बैठकीत दोनही पक्षांकडून महायुतीचा नारा देण्यात आला. भाजप पक्ष कार्यालयात झालेल्या या बैठकीत शिंद सेनेचे खासदार नरेश म्हस्के, महिला आघाडी प्रमुख मिनाक्षी शिंदे, राम रेपाळे आणि पूर्वेश सरनाईक उपस्थित होते. तर भाजपकडून आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे, शहर अध्यक्ष संदीप लेले आणि संजय वाघुले हे पदाधिकारी उपस्थित होते.

सव्वा तास चालेल्या या प्राथमिक बैठकीत दोनही पक्षाकडून महापालिकेत महायुतीचे अधिक नगरसेवक कसे निवडून येतील याचा नारा देण्यात आला. कोणीही कुठेही युतीच्या उमेदवार पाडण्यासाठी प्रयत्न करणार नाही, यावरदेखील एकमत झाल्याची माहिती सूत्रांनी दिली तर ठाण्यात शिंदे सेनेकडे अधिकचे नगरसेवक असल्याने त्यांच्याकडून पुढील बैठकीत जागा वाटपाचा प्रस्ताव आणण्यात यावा, असे मत यावेळी भाजपच्या नेत्यांनी व्यक्त केल्याची माहिती समोर आली आहे. परंतु हा प्रस्ताव पुढे आणत असतांना भाजपचा योग्य तो सन्मान राखला जाईल याची काळजी घेतली जावी अशी भावनाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

## माजी आमदार नरेंद्र पवार यांची संकल्पना

# 'वंदे मातरम'च्या 150 वर्षावर आधारित दिनदर्शिकेचे प्रकाशन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने कल्याण पश्चिमचे माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या अभिनव उपक्रमातून विशेष दिनदर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते करण्यात आले.

कल्याण पश्चिमचे माजी आमदार नरेंद्र पवार हे नेहमीच आपल्या राष्ट्रभक्ती, कल्पकता कृतिशीलतेसाठी परिचित आहेत. यंदाही त्यांनी असाच एक अभिनव उपक्रम हाती घेतला. आणि त्यातूनच मग स्वातंत्रलढ्याचा ऊर्जा मंत्र असणारे राष्ट्रगीत वंदे मातरमच्या 150 व्या वर्षानिमित दिनदर्शिकेचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या भव्य प्रकाशन सोहळयास महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार कपिल पाटील तसेच आमदार किसन कथोरे, आमदार चित्रा वाघ, गुलाबराव करंजुले यांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमाच्या माध्यमातून 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचे ऐतिहासिक महत्त्व आणि देशभक्तीची भावना जनमानसात अधिक बळकट करण्याचा संदेश देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाला नागरिकांसह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शिंदे सेनेच्या इच्छुकांची आनंद आश्रमात झुंबड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

आगामी महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, ठाण्यातील आनंद आश्रमात इच्छुक उमेदवारांची भाऊगर्दी दिसत आहे. बुधवारपासून शिंदे सेनेकडून इच्छुकांसाठी आनंद आश्रमात अर्ज देण्यास सुरुवात झाली आहे. यात आजी माजी नगरसेवकांसह अनेक इच्छुक अर्ज घेण्यासाठी रांगेत उभे असल्याचे दिसून आले. त्यात मागील २००७ पासून काही इच्छुक हे अर्ज घेऊन जाण्याचे काम करीत असल्याचे दिसून आले. परंतु आता पक्ष आपली दखल घेईल अशी अपेक्षा त्यांनी वाटत असून आता तरी तिकीट मिळणार का, असा सवाल या निमित्ताने त्यांच्याकडून उपस्थित केला जात आहे.मागील २९ वर्षे ठाणे महापालिकेत शिवसेनेची सत्ता आहे. त्यामुळे या सत्तेत आपणही सहभागी व्हावे, अशी अपेक्षा प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात आहे. या रांगेत मागील तीन ते चार टर्म नगरसेवक असलेलेदेखील या रांगेत अर्ज घेण्यासाठी उभे होते तर अनेक नवीन चेहरे, जेष्ठांसह महिलांची संख्या ही अधिकची दिसून आली

# अखेर पंधरा दिवसांनंतर ठाण्याचा पाणी पुरवठा सुरळीत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : ठाणे - ठाणे महापालिकेच्या योजनेतून शहराला पाणी पुरवठा करणारी जलवाहीनीच्या दुरुस्तीचे काम बुधवारी रात्री पुर्ण झाल्यानंतर गुरूवार सकाळपासून शहराचा पाणी पुरवठा पूर्ववत करण्यात आला. परंतु या जलवाहिनीच्या दुरुस्ती कामासाठी शहरात गेले पंधरा दिवस ५० टक्के पाणी कपात लागू करण्यात आल्याने शहरातील पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडले असून हे वेळापत्रक पुन्हा रुळावर येण्यासाठी आणखी दोन दिवस लागण्याची शक्यता आहे.

ठाणे महापालिका क्षेत्राला पाणी पुरवठा करणाऱ्या महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतील जलवाहिनी ६ डिसेंबर रोजी कल्याण फाटा येथे महानगर गॅस कंपनीच्या कामादरम्यान फुटली. ही जलवाहिनी जुनी आणि प्रिस्ट्रेस कॉंक्रीट पद्धतीची असल्यामुळे तिच्या दुरुस्तीसाठी पाच दिवस लागले. या काळात ३० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली होती. जलवाहीनी दुरुस्तीनंतर पाणी पुरवठा सुरू करताच, जलवाहिनी आणखी तीन ठिकाणी फुटली असल्याची बाब पालिका प्रशासनाच्या निदर्शनास आली. यानंतर पालिकेने १९ डिसेंबर पर्यंत ५० टक्के पाणी कपात लागू करत दुरुस्तीचे काम हाती घेतले होते. दुरुस्तीचे काम बुधवारी रात्री पुर्ण झाल्यानंतर गुरूवार सकाळपासून शहराचा पाणी पुरवठा पूर्ववत करण्यात आला. परंतु या जलवाहिनीच्या दुरुस्ती कामामुळे गेले पंधरा दिवस पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडले आहे. अनेक संकुलांच्या टाक्या रिकाम्या आहेत. पालिकेच्या पाणी साठवणूक टाक्या रिकाम्या आहेत, त्या भरून पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक पुन्हा रुळावर येण्यासाठी आणखी दोन दिवस लागण्याची शक्यता आहे.

# पेण येथे कारला अचानक आग | तीनही प्रवाशी सुखरूप बाहेर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** पेण–खोपोली मार्गावर १६ डिसेंबरच्या सायंकाळी सव्वासातच्या सुमारास चालत्या कारला अचानक आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, कारला आग लागलेली पाहताच नागरिकांची मोठी गर्दी जमा झाली.

कारमधील तीनही तरुणांनी प्रसंगावधान राखत वेळीच बाहेर उडी घेतल्याने जीवितहानी टळली. मात्र आगीमुळे कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पेण नगरपरिषद अग्निशमन दल तत्परतेने घटनास्थळी दाखल झाले आणि काही वेळातच आग आटोक्यात आणण्यात यश मिळवले.या घटनेत प्रवास करणाऱ्यांची नावे अजय प्रल्हाद मानकर (वय २९), अजय गौतम पगारे (वय २४) आणि चेतन संदीप इंदोरे (वय २२) अशी आहेत. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली.




# गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारक परिसरातील अतिक्रमणे रोखण्यासाठी समिती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्यातील गड-किल्ल्यांप्रमाणेच राज्य संरक्षित स्मारकांच्या ठिकाणांवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार सांस्कृतिक कार्य विभागाच्या यापूर्वीच्या (दि. २० जानेवारी २०२५) शासन निर्णयातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे काढण्याबाबतच्या तरतूदींची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. यामध्ये आता राज्य संरक्षित स्मारकांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील सर्व गड-किल्ले तसेच राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे काढून



टाकण्यासाठी व भविष्यातील अतिक्रमणे रोखण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. समितीचे सांस्कृतिक कार्य मंत्री अध्यक्ष असतील. तर समितीमध्ये महसूल मंत्री, ग्रामविकास मंत्री, पर्यटन मंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, वन मंत्री, बंदरे व विकास मंत्री तसेच संबंधित विभागांचे सचिव, प्रधान सचिव किंवा अपर मुख्य सचिव यांचा समावेश असणार आहे.

**सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय**

~~राज्यस्तरीय समितीमध्ये चार निमंत्रित~~ सदस्यांचा समावेश करण्यास तसेच प्रत्येक जिल्ह्यात गठीत करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय समितीमध्ये चार अशासकीय सदस्यांचा समावेश करण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. हे अशासकीय सदस्य गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांचे अभ्यासक असावेत किंवा संरक्षण व संवर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत असलेली व्यक्ती अथवा स्वयंसेवी संस्था असावी, अशी अट ठेवण्यात आली आहे.

**राज्यातील सर्व गड-किल्ले तसेच राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे काढून टाकण्यासाठी व भविष्यातील अतिक्रमणे रोखण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.**

जिल्ह्यातील गड-किल्ले व राज्य संरक्षित स्मारकांवरील अतिक्रमणे रोखणे व ती काढून टाकण्याची कारवाई संबंधित जिल्हाधिकारी यांना त्या-त्या जमिनीच्या मालकीच्या विभागाच्या समन्वयाने करावी लागणार आहे. तसेच यासाठीचा खर्च जिल्हा नियोजन व विकास निधीमधून करता येणार आहे.

# भिवंडीत जिल्हा परिषद शाळेचे भूमिपुजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा :** स्वामी नित्यानंद बाबाच्यां पदस्पर्शाने पावन झालेल्या भिवंडी तालुक्यातील गणेशपुरी येथे जिल्हा परिषदेच्या पूर्व प्रार्थमिक विद्या मंदिर शाळेचे भूमिपूजन ठाणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष गजानन भाऊराव पाटील, सरपंच संदीप खिराडे, उपसरपंच प्रकाश सुतार यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.

गणेशपुरी ग्रामपंचायतीच्या वतीने मंगळवारी जिल्हा परिषद शाळेचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास श्री भिमेश्वर सद्गुरु नित्यानंद संस्थानचे विश्वस्त रवींद्र शुक्ला, अमित राऊत, वज्रेश्वरी न्यू इंग्लिश स्कूलचे विश्वस्त अरुण पाटील, माजी उपसरपंच प्रमोद जाधव, वज्रेश्वरी ग्रामपंचायतीचे सरपंच रमेश जाधव, नित्यानंद भक्त रामू नाईक, नामदेव पाठारी, प्रवीण शेट्टी, अनता शेलार, संजय पाटील, आदीसह शाळेचे माजी विद्यार्थी पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कामासाठी ग्रामपंचायतीने वेळोवेळी पाठपुरावा केल्यामुळे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, माजी केंद्रीय मंत्री कपील पाटील, भिवंडी खासदार सुरेश म्हात्रे,( बाळ्या मामा),आमदार



किसन कथोरे,विनोद निकोले, उपवनसंरक्षक सास्ते आदींच्या सहकार्यामुळे वनखात्याची एकूण १३ गुंठे जागा शाळेसाठी मिळाली त्यामुळे ठाणे जिल्हा परिषदेच्या सर्व शिक्षा अभियानअंतर्गत या शाळा बांधकामास १,५२,६३८२५ (एक करोड बाव्वन लाख त्रेषस्ट हजार आठसे पंचवीस रुपये) निधी प्राप्त झाल्यामुळे या शाळेचे बांधकाम सुरू करण्यात येणार आहे. या भूमिपूजन प्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद भोईर, सह सदस्य किरण हाडळ,श्रेया पाटील,अंजली रमेश कामडी,दिपाली कोल्हेकर,कृपाली पाटील,राहुल चव्हाण,श्यामसुंदर जत्तन,प्रिया सुतार,पारू घाटाल,उर्मिला भोरड.गितांजली घरत आदी मान्यवर उपस्थित होते, आपल्याला शाळेची नवीन व सुसज्ज इमारत मिळणार असल्याने त्यामुळे येथील शालेय विद्यार्थी व पालक यांच्यात समाधान व्यक्त होत आहे.

# नाताळ आणि नूतन वर्षानिमित्त राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई



**विदेशी मद्याच्या एकूण ७११ बॉक्ससह कंटेनर आणि मोबाईल असा एक कोटींचा मुद्देमाल जप्त**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नाताळ आणि नूतन वर्षानिमित्त राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कल्याण विभागाने कारवाई करत गोवा निर्मीत मध्यप्रदेश राज्यात विक्रीसाठी असलेले विदेशी मद्य साठा वाहतूकीवर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत विदेशी मद्याच्या एकूण ७११ बॉक्ससह कंटेनर आणि मोबाईल असा एक कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असून याप्रकरणी चालक आसिफ आस महम्मद याला अटक करण्यात आली आहे.

नाताळ आणि नूतन वर्षानिमित्त बातमीदाराकडून मिळालेल्या बातमीप्रमाणे परराज्यातील (गोवा) मद्याची वाहतूक होणार असल्याचे समजल्याने मुंबई नाशिक महामार्ग, भिवंडी बायपास येथे मंगळवारी दारूबंदी गुन्हयाकामी गस्त घालत असताना रात्री अशोक लेलॅन्ड कंपनीच्या कंटेनरवर संशय आल्याने या वाहनास थांबवून त्याची तपासणी केली असता वाहनाच्या आतमध्ये महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी बंदी असलेला गोवा निर्मात व मध्यप्रदेश या राज्यातील विक्रीसाठी असलेला विदेशी मद्य असा एकूण ७११ बॉक्स मध्ये रॉयल सिलेक्ट डिलक्स व्हिस्कीचे एकूण ५५४ बॉक्स मिळून आहे. तर रॉयल ब्ल्यू व्हिस्कीच्या सिलबंद बाटल्यांचे एकूण 157 बॉक्स मिळून आले.

या वाहनावर छापा घालून गुन्हा नोंद करण्यात आला असून एकूण विदेशी मद्य ७११ बॉक्स दारूबंदी गुन्ह्याअंतर्गत जप्त केले आहेत. तसेच या गुन्ह्यामध्ये अशोक लेलॅन्ड कंपनीचा, पांढऱ्या रंगाचा केबीनच्या कंटेनरसह एकूण.१ कोटी ९१ हजार ८८० किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी असिफ आस मोहम्मद (वाहन चालक) याला अटक केली आहे. हि कारवाई राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक दिपक परब, दुय्यम निरीक्षक आर.व्ही. सानप, टि.सी. चव्हाण, ,राज्य उत्पादन शुल्क, भिवंडी विभाग निरीक्षक एन.जे. शिरसाठ, जवान आर.एम.राठोड, के. एस. वझे, व्ही.एस. कुंभार, एन. अ.लोखंडे या स्टाफसह करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास अधीक्षक उत्तम शिंदे, उपअधीक्षक अभिजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक दिपक परब हे करीत आहेत.

# आंतरशालेय लेझीम स्पर्धेत एन.आर.सी. शाळा प्रथम | स्वामी विवेकानंद दत्तनगर माध्यमिक द्वितीय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** आप्पासाहेब शिंदे क्रीडा प्रतिष्ठानच्या माध्यमातून १६ डिसेंबर रोजी आप्पासाहेब शिंदे ठाणे जिल्हास्तरीय आंतरशालेय लेझीम स्पर्धा २०२५ चे भव्य आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचा उद्घाटन सोहळा संस्थेचे अध्यक्ष विक्रांत शिंदे व कल्याण मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष व सम्राट अशोक शाळेचे मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांच्याहस्ते संपन्न झाला. सचिव अविनाश नलावडे यांनी लेझीम स्पर्धा आयोजनाचा हेतू प्रास्ताविकेतून स्पष्ट केला. लेझीम हा महाराष्ट्राचा पारंपारिक मर्दानी खेळ असून या खेळातील विविध व्यायाम प्रकारातून शारीरिक सुदृढता वाढते, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले.

लेझीम स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त तज्ज्ञ क्रीडा शिक्षक ॲड. अनिल बनसोडे, मावळी मंडळ हायस्कूलचे तज्ज्ञ क्रीडा शिक्षक ॲड. प्रमोद वाघमोडे आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेतील तज्ज्ञ क्रीडा शिक्षिका प्रिया पेंडुलकर हे उपस्थित होते.



बक्षीस वितरण सोहळयासाठी प्रमुख अतिथी म्हणून सैनिकी विद्यालय खडवली येथील कमांडंट शंकरराव यादव (रि. कर्नल ), अध्यक्ष विक्रांत शिंदे, एन.आर.सी. इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक संजय मेहता, मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका नेहा खेडेकर, सम्राट अशोक प्राथमिक विद्यालय मुख्याध्यापिका सुजाता नलावडे, तिसाई विद्यालयाच्या निर्मला वाघ, आप्पासाहेब शिंदे क्रीडा प्रतिष्ठानचे सदस्य संतोष सावंत, योगेश सावंत, कमलेश ठाकरे, राजेंद्र लिंगायत आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी विक्रांत शिंदे यांनी सर्व लेझीमपटू, शिक्षक व मुख्याध्यापक यांचे कौतुक केले आणि प्रत्येक वर्षी ठाणे जिल्हास्तरीय आंतरशालेय लेझीम स्पर्धा घेतली जाणार असे घोषित केले. लेझीम स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नंदलाल पवार, उदय नाईक, प्रवीण खाडे, मुकुंद गायधनी, संजय काळे, अविनाश ओंबासे, सुभाष मते, राजेश मानवडे, दीपक माने, सुनील भुसारे, सुदर्शन प्रश्न, चन्ने, अंकुर आहेर व स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले. लेझीम स्पर्धेसाठी क्रीडांगण तयार करण्यासाठी जय जिजाऊ क्रीडा मंडळाच्या खेळाडूंनी विशेष मेहनत घेतली.

स्पर्धेत विविध शाळांच्या माध्यमातून सुमारे ८५० लेझीमपटूंनी सहभाग घेतला. सर्व सहभागी शाळांना प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी २० लेझीम व प्रत्येक सहभागी लेझीमपटूंना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रवीण खाडे यांनी केले.

# भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी सर्वंकष कृती आराखडा राबवावा : आयुक्त सौरभ राव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (16) :** ठाणे महानगरपालिका हद्दीतील नागरिकांची सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य व प्राणी कल्याण या त्रिसूत्रीच्या अनुषंगाने भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी सर्वंकष व शास्त्रीय कृती आराखडा राबविण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या बैठकीत दिल्या. मा. सर्वोच्च न्यायालयातील Suo Motu Writ Petition (Civil) No. 5 of 2025 च्या पार्श्वभूमीवर आज आयुक्त दालनात बैठक पार पडली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, उपायुक्त मनिष जोशी, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी




डॉ. प्रसाद पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, पशुवैद्यकीय अधिकारी क्षमा शिरोडकर आदी उपस्थित होते.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 7 नोव्हेंबर 2025 रोजी दिलेल्या आदेशानुसार भटक्या श्वानांसाठी पाच निर्देशित संस्थांमार्फत स्वतंत्र निवारे (Shelters) व केनेल सुविधा उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शाळा, रुग्णालये, क्रीडा संकुले, बस डेपो व रेल्वे स्थानके यांसारख्या संवेदनशील व संस्थात्मक परिसरांतून पकडलेले श्वान त्या-त्या ठिकाणी पुन्हा सोडण्यात येणार नाहीत, तर त्यांना सुरक्षित निवाऱ्यांमध्ये ठेवण्याच्या सूचना आयुक्त सौरभ राव यांनी बैठकीत दिल्या.

ठाणे महानगरपालिकेमार्फत प्राणी जन्म नियंत्रण (श्वान) नियम, 2023 नुसार पकड- नसबंदी- लसीकरण- पुनर्स्थापना (Animal Birth Control (Dogs) Rules, 2023 नुसार Capture–Sterilise–Vaccinate–Release (CSVR)) कार्यक्रम अधिक प्रभावी व सातत्यपूर्ण पद्धतीने राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत भटक्या श्वानांची नसबंदी व लसीकरण करूनच त्यांचे व्यवस्थापन करण्यात येईल. आजारी, जखमी, रेबीजग्रस्त व संशयित रेबीज बाधित श्वानांवर नियमानुसार स्वतंत्र कार्यवाही केली जाणार आहे. भटक्या श्वानांची संख्या नियंत्रित करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने नसबंदी केंद्रांची क्षमता वाढविण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या श्वानांची अंदाजित संख्या शास्त्रीय पद्धतीने निश्चित करून त्यानुसार केनेल व शेल्टर क्षमतेचे नियोजन करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक मनुष्यबळ, वाहने, उपकरणे तसेच पशुवैद्यकीय सुविधा वाढविण्यात येतील. तसेच रॅबीज प्रतिबंधक लस व इम्युनोग्लोब्युलिनची उपलब्धता सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये सुनिश्चित करण्यात येणार असल्याचे उपायुक्त मनिष जोशी यांनी बैठकीत सांगितले.

नागरिकांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने भटक्या श्वानांना खाद्य (Feeding Zones) देण्याचा परिसर निश्चित करण्यात येणार असून, यासाठी शहरात जनजागृती केली जाणार आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देत, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व निर्देशांचे काटेकोर पालन करून भटक्या श्वानांचा प्रश्न मानवीय, शास्त्रीय व कायदेशीर पद्धतीने सोडविण्यास ठाणे महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहनही आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.




# राष्ट्रीय सेवा योजनेच्या पाचदिवसीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिराला सुरुवात

**दैनिक. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमधील नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने बदलापूर राहटोली येथील आरोग्य योगा आणि नॅचरोपॅथी सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या पाचदिवसीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन उत्साहात पार पडले. मुंबई विद्यापीठाच्या एनएसएस सेल आणि एस.एस.टी. महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात ठाणे जिल्ह्यातील ११७ महाविद्यालयांमधून निवडलेल्या १४० स्वयंसेवकांचा सहभाग आहे.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्रा. रमेश देवकर, एस.एस.टी. महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी,




उद्योजक डॉ. मिलिंद धारवाडकर, आरोग्य योगा व नॅचरोपॅथी सेंटरचे संचालक डॉ. विजय कुकरेजा, एम.के. कॉलेजचे उपप्राचार्या डॉ. किरण वाटवानी, एस.एस.टी महाविद्यालयाचे उपप्राचार्य व ठाणे जिल्हा एनएसएस समन्वयक प्रा. जीवन विचारे, उपप्राचार्य डॉ. दीपक गवादे, प्रा. देविदास जळकोटे, विभागीय समन्वयक डॉ. संदेश जायभाय, डॉ. राजू रूपवते, प्रा. नीरज मिश्रा, कार्यक्रम अधिकारी प्रा. मयूर माथूर व प्रा. श्रुती पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. रमेश देवकर यांनी एनएसएस लीडर्सची भूमिका स्पष्ट करत उपक्रमांचे आयोजन, अंमलबजावणी तसेच त्यांचे प्रभावी दस्तऐवजीकरण कसे करावे, याविषयी सविस्तर माहिती दिली. हे शिबिर स्वयंसेवकांमधील नेतृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी सुवर्णसंधी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्राचार्य डॉ. पुरस्वानी यांनी विद्यार्थ्यांना स्वतःमधील सुप्त क्षमतांचा विकास करून वैयक्तिक व सामूहिक प्रगती साधण्याचा प्रेरणादायी कानमंत्र दिला.

या नेतृत्व प्रशिक्षण शिबिरात विविध सत्रांद्वारे तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार असून, त्यामध्ये एनएसएस ची ध्येय–उद्दिष्टे, वर्षभरातील उपक्रमांचे नियोजन, अहवाल लेखन व दस्तऐवजीकरण, दत्तक गावांमधील कार्य, एनएसएस लीडरची भूमिका तसेच आपत्ती व्यवस्थापन आदी विषयांचा समावेश आहे. शिबिराच्या समारोपप्रसंगी उत्कृष्ट स्वयंसेवकांचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. हे शिबिर युवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि संघटन कौशल्य वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# नवापूर ग्रामविकास अधिकारी रंगेहात लाच स्वीकारताना अटक

**दैनिक. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर :** पालघर तालुक्यातील नवापूर ग्रामपंचायत हद्दीत ग्रामविकास अधिकाऱ्याचा लाचखोरीचा प्रकार उघडकीस आला असून, 20 हजार रुपयांची लाच स्वीकारताना संबंधित अधिकाऱ्याला रंगेहात अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली आहे.

तक्रारदार यांच्या मालकीच्या शेती मध्ये कृषी पर्यटना साठी तरंग तलाव, तीन रूम उपहार सुरू करण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायत ना-हरकत दाखला (NOC) मिळवण्यासाठी 30 ऑक्टोबर 2025 रोजी ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र दाखला देण्यासाठी ग्रामविकास अधिकाऱ्याने 20 हजार रुपयांची लाचेची मागणी केली.

या मागणीमुळे त्रस्त झालेल्या तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर सापळा रचण्यात आला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारताना संबंधित ग्रामविकास अधिकारी रंग हाताने पकडले गेले.

या कारवाईनंतर ग्रामपंचायत कार्यालयात एकच खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त केली जात आहे. सरकारी कामासाठी नागरिकांना लाच द्यावी लागते, ही बाब दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुढील तपास सुरू केला असून, संबंधित अधिकाऱ्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024